# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/१०/२०१८
## दि.२५/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३२९/१८,भादविक ३९४,३२३,५०४,५०६,३४ मु.पो.का.३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | अगंद यादव,वय-१९ वर्षे,रा.मुजांबावस्ती धानोरी,पुणे |
| **आरोपी** | १.रोहन सरतापे,वय-१८ वर्षे,रा.चौधरीनगर मुजांबावस्ती धानोरी,पुणे २.नवीन रफिक पंडीत, वय-२६ वर्षे,रा.मुंजाबावस्ती,चौधरीनगर धानोरी,पुणे (अटक) एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/१०/२०१८ रोजी १९/०० वा.गल्ली न.१४ जवळील नाल्या जवळ मुंजाबा वस्ती,धानोरी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कामावरुन सुटुन त्यांचे राहते घरी जात असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,उलटया कोयत्याने त्यांचे खांदयावर मारुन जखमी केले. तसेच त्यांचे गळयावर चाकु लावुन,त्यांच्या खिशातील ५००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेतले आहे. (फिर्यादी यांनी आरडा-ओरडा केल्यानंतर तेथील काही नागरीकांनी मिळुन दोन इसमांना पकडुन पोलीसांना फोन करुन बोलावुन त्यांचे ताब्यात दिले आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एम.कोरडे ९९७०२३३७१२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३८०/१८,भादविक ३५४(ड),१८६ |
| **फिर्यादी** | म.पो.शि. खडक पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१०/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा ते दु.१३/०० वा. चे दरम्यान खडक पोलीस ठाणे पुणे शहर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया खडक पोलिस ठाणे येथील ठाणे अंमलदार कक्षात हजर असताना, अंमलदार कक्षात असलेले कक्षातील फोनवर,कोणीतरी अज्ञात मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांना वारंवार फोन करुन,त्यांना अश्लिल भाषा वापरुन,फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात बाधा निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विजयकुमार शिंदे ९८२१११८६५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३७८/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अविनाश देशमुख,वय-७० वर्ष,रा.शुक्रवार पेठ,सुभाषनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँकचे खातेधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०१८ रोजी सकाळी ११/०० ते १३/०० वा. चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात मोबाईल व बँकचे खातेधारक यांनी फिर्यादी यांचे मित्राचे नावाने बनावट मेल आयडीचा वापर करुन,फिर्यादी यांना त्यांचे मित्र हे नेपाळ येथील हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी ॲडमीट असुन,त्यांना ९३,८००/- रुपयेची गरज आहे असे मित्राचे मेलव्दारे सांगुन,नमुद कालावधी मध्ये त्याचे बँकेचे खात्यावर १,००,०००/- रूपये भरण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एम.एच.तडवी ७७१९०७५४२२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ४०९/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४२,रा.१३४५,कसबा पेठ,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०३/२०१८ ते दि.०३/०७/२०१८ रोजीचे कालावधीत ई-मेलद्वारे ऑनलाईन पध्दतीने |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना नोकरीस असलेल्या कंपनीच्या नावे असलेला ई-मेल आयडीसारखा बनावट ई-मेल तयार करुन,त्यादवारे कंपनीचे मालकांचे मेलवर सदर बनावट मेलचे डीटेल्स देवुन,पर्चेस ऑर्डरचे पेमेंट करण्यास सांगुन,कंपनीची एकुण २४,५०,०००/- रुची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा फिर्यादी यांनी केलेल्या अर्जावरुन दाखल झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) के.व्हि.इंदलकर ९९२३६९४५१२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५२७/१८,भादविक ४२०,महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा ७४(२) |
| **फिर्यादी** | प्रकाश कुलकर्णी,वय-४१ वर्षे,रा.पिंपळे-निलख,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन जुलै-२०११ ते सन २०१४ रोजी ते आजपावेतो मेसर्स युलीक इंन्टरटेक प्रा.लिमीटेड साई हेरीटेज स.नं.१३१/१ बि.बाणेर,म्हाळुंगे रोड, बाणेर पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे मेसर्स युलीक इंन्टरटेक प्रा.लिमी. साई हेरीटेज,स.नं.१३१/१,बाणेर, म्हाळुंगे रोड,बाणेर पुणे या कंपनीचे डायरेक्टर असुन,त्यांनी व्यवसाय करतेवेळी रचनेनुसार कर गोळा करुन तो शासनास भरावयाचा असताना,त्यांनी वेळोवेळी जमा होणा-या व्यवसायातील रकमेवरील मुल्यवर्धित कर महाराष्ट्र शासनाच्या तिजोरीत भरण्याचे काम सदर कंपनीचे नमुद डायरेंक्टर सदर इसम यांचेवर बंधनकारक असताना,त्यांनी सन २०११ ते २०१४ या कालावधी पर्यंतची कराचे रकमेवरील आजपावेतो व्याजासहित सर्व मिळुन एकुण १,८६,२६,००६/- रुपये एवढी रक्कम त्यांचेवर भरणे बंधनाकरक होते. त्यांना सदरबाबत फिर्यादी यांनी त्यांचे कार्यालयातुन कायदेशीर नोटीस देवुन,कर भरणेबाबत सुचित केलेले असतानाही त्यांनी मुल्यवर्धित कराची रक्कम शासनास न भरता शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.ए.क्षीरसागर ९०७७१००१०० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २९८/१८,भादविक ४२०,४६४,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५ वर्षे,रा.शिवतेजनगर कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | सागर प्रल्हाद बिबवे,वय-३१,रा.बिबवेवाडी गाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०१७ ते दि.२४/१०/२०१८ रोजीपर्यंतचे कालावधीत बँक ऑफ महाराष्ट्र,पद्मावती शाखा क्र.३१५,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बँक ऑफ महाराष्ट्र,पद्मावती शाखा क्र.३१५,पुणे येथे शाखा प्रबंधक म्हणुन कार्यरत असुन,यातील नमुद इसमाने वाहन कर्ज सुविधा मिळवण्यासाठी “स्काय मोटो ऑटोमोबाईल” यानावाने वाहन कर्ज मंजुरीसाठी खोटे दस्तऐवज बनवुन,त्याचेवर खोटया सह्या करुन,फिर्यादी यांचे बँकेची एकुण १९,०७,०००/- रुपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. टी.जी.घावटे ९५९४६१५५३३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २२१/१८,भादविक ३५३,२७९,मो.वाहन अधि.कलम १८४,१२२,२/१७७ |
| **फिर्यादी** | प्रमोद कोकणे, पोलीस नाईक, वाहतुक विभाग डेक्कन पुणे शहर |
| **आरोपी** | रविंद्र श्रीधर जाधव,वय-४६ वर्षे,रा.विनया अपार्टमेंट,विश्रांतवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१०/२०१८ रोजी २०/३० वा. सुभद्रा हॉटेलचे समोर जंगली महाराज रोड,पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सुभद्रा हॉटेल समोर वाहतुक नियमन करीत असताना,यातील नमुद इसम रविंद्र जाधव याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुक नियमांचे पालन न करता,विरुध्द दिशेने भरधाव वेगाने येवुन,फिर्यादी यांचेशी विनाकारण हुज्जत घालुन,तुम्हाला काय करायचे ते करा असे म्हणुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.ए.कोळंबीकर ९४०४९०११११ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २९५/१८,भादविक ३८७,४१९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५५,रा.जंगली महाराज रोड,डेक्कन,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/११ ते १६/४२ वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांना फोन करून मी मुंबई येथुन पोलीस अधिकारी बोलत आहे असे सांगुन,त्यांना वेळोवेळी फोन करून जीवे मारण्याची धमकी देवुन त्यांना गुन्हयात अडकविण्याची व मिडीया मध्ये बातमी देवुन बदनामीची धमकी देवुन,फिर्यादी यांना खंडणीपोटी १० लाख रूपयेची मागणी केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राहुल घुगे, खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा,पुणे शहर ९५५२५९०३४७ |
| ९ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५५९/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | प्रदीप बदगुडे,वय-४६,पुणे मनपा सुरक्षा विभाग,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१०/२०१८ रोजी पहाटे ०२/०० वा. कात्रज राजीव गांधी प्राणी संग्रहालय,कात्रज,पुणे सर्पोद्यान मोर पिंजरा किचन गेट खंदकाचे रोडचे भागा मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे मनपा सुरक्षा विभाग,पुणे येथे नोकरी करीत असुन,नमुद वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने कात्रज राजीव गांधी प्राणी संग्रहालय,कात्रज,पुणे सर्पोद्यान मोर पिंजरा किचन गेट खंदकाचे रोडचे भागा मधील चंदनाचे झाड कशाचे तरी सहायाने तोडुन,चंदन असलेला लाकडी ओंडकाचा आतील भाग कापुन ४ हजार रू किचा चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. एस.व्हि. तुळसुळकर ९९२३४४५७५१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**